# मुख्यमंत्र्यांचा जागला 'हृदयस्वर'

## विलासराव देशमुख : सावनी शेंडेंच्या पुस्तकाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. १० : राजकारणासारख्या कधीही एका सुरात न बोलणाऱ्या क्षेत्रात राहून अभिजात संगीताची आवड जोपासणाऱ्या मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हृदयातील स्वरांना आज रसिकांनी मनमुराद दाद दिली.

निमित्त होते गायिका सावनी शेंडे यांनी रचलेल्या बंदिशींच्या 'हृदयस्वर' या पुस्तकाच्या आणि 'सीडी'च्या प्रकाशनाचे! ज्येष्ठ गायक पंडित जसराज, प्रसिद्ध गायिका वीणा सहस्रबुद्धे, कुसुम शेंडे, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार, संजीव शेंडे, हे पुस्तक प्रकाशित करणारे रोहन प्रकाशनाचे प्रदीप चंपानेरकर व्यासपीठावर उपस्थित होते.



**कोथरूड : गायिका सावनी शेंडे यांच्या बंदिशीच्या 'हृदयस्वर'या पुस्तकाचे आणि 'सीडी'चे प्रकाशन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी (डावीकडून) ज्येष्ठ गायक पंडित जसराज, देशमुख आणि शेंडे.**

देशमुख म्हणाले, "आमचे क्षेत्र कधी एका सुरात न बोलणारे क्षेत्र आहे. प्रत्यक्षात एखादा सूर बिघडला, तरी गाणे बिघडते. आम्ही फक्त संगीत ऐकणारे रसिक आहोत. सध्या 'पॉप-रॉक'चा जमाना आहे; परंतु अभिजात भारतीय संगीत हा आपला मूळ ठेवा आहे. तो जपला पाहिजे. सावनी शेंडे यांच्यासारख्या तरुण गायिकेच्या मनात बंदिशी रचण्याच्या दिशेने विचार सुरू होतात, हे कौतुकास्पद आहे. डोक्यातून येणारे स्वर हे ऐकलेले असतात, हृदयातून येणारे स्वर हेच खरे स्वर असतात. ज्यांनी स्वतःला संगीतास समर्पित केले, त्यांच्याच हृदयातून अशा रचना जन्म घेतात."

मुख्यमंत्री विलासराव देशमुख संगीताची आवड जोपासणारे आहेत. त्यामुळे ते केवळ पदाने मुख्यमंत्री नाहीत, तर 'आमच्या मनातील मुख्यमंत्री' आहेत, अशा भावना पंडित जसराज यांनी व्यक्त केल्या. बंदिशी-कविता या शिकवून येत नाहीत, तर ती जन्मजात प्रतिभा आहे, असेही ते म्हणाले. अरुण नूलकर यांनी सूत्रसंचालन केले. रंजना काळे यांनी उपस्थित रसिकांचे यावेळी आभार मानले.


e सकाळ इंटरनेट

'हृदयस्वर' या पुस्तक प्रकाशनाचा आणि सावनी शेंडे यांनी सादर केलेल्या गाण्यांचा व्हिडीओ पाहा ई-सकाळवर.
http://www.esakal.com